भाग २ रा

# नीती, राजनीती, शिवाजीची राजनीती

*अनीतिरेव सच्छिद्रं राज्ञो नित्यं भयावहं ।*
*शत्रुसंवर्धनं प्रोक्तं बल ऱ्हासकरं महत् ।।*
*शुक्रनीति अ. १ श्लोक १५*

अर्थ- भोकें पडलेल्या भांड्याप्रमाणें राजास नीतिविरहित असणें धोक्याचें असून त्याच्या योगानें शत्रूचें संवर्धन होतें, व त्याची शक्ती व कार्यक्षमता क्षीण होते.

पृथ्वीचे पाठीवर कोणत्याही प्रदेशांत राहणारा मानवी समाज, अनेक मानवी व्यक्तींच्या समूहाचा बनलेला असतो. अशा समूहाचा घटक या नात्यानें त्या समूहांतील इतर मानवी व्यक्तींच्या, सान्निध्यांत व सहवासांत नांदत असतां स्वत:च्या स्वास्थ्यासाठीं व सुखमय नांदणुकीसाठीं त्या समूहाच्या समष्टिरूप मनास संमत झालेले व त्याच्या समष्टिरूप कल्याणास कारणीभूत होणारे विशिष्ट प्रकारचे नियम त्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीस आचरावे लागतात. या नियमांच्या समुच्चयास ''नीती'' ही संज्ञा आहे. शुक्रनीतींतील खालील श्लोकांत हेंच दर्शविलें आहे.

*अथ साधारणं नीतिशास्त्रं सर्वेषु चोच्यते ।*
*सुखार्थास्सर्वभूतानां मतास्सर्वा: प्रवृत्तय: ।। शु. अ. ३ श्लो.,*
*सुखं च न विना धर्मात् तस्माद्धर्मपरो भवेत् ।। शु. अ. ३ श्लो. २*

अर्थ :- आतां सामान्य नीतीचे नियम सांगतों. सर्व मानवी प्राणी सुखप्राप्तीस्तव कर्म करितात, पण नीतिविना सुखप्राप्ति नाहीं, यास्तव सर्वांनीं नीतीनें वागावें.

हे जे विशिष्ट प्रकारचे आचरावयाचे नियम ते त्या समाजांतील व्यक्तीस कमी अधिक प्रमाणानें पाळणें भाग पडतें. निरनिराळ्या मानवी समाजांत विद्यमान् असणारे नीति-नियम हे एकच स्वरूपाचे असतात असें नाहीं. या नीति-नियमांपैकीं कांहीं अगदीं थोडे नियम वगळले असतां बाकीचे नियम निरनिराळ्या मानवी समाजांत सदासर्वकाळ सारखेच आदरणीय समजले जात नाहींत. जो नियम एका मानवी समाजांत जितका आदरणीय

समजला जातो, तोच नियम दुसऱ्या एकाद्या समाजांत तितका आदरणीय समजला जात नाहीं. सत्य बोलणें, परक्याच्या वस्तूंचा अपहार न करणें, परस्त्रीशीं व्यभिचार न करणें, परक्याचें मन दुखावलें जाईल असें कृत्य न करणें; परक्यास अकारण पीडा न करणें, या नीतींत अंतर्भूत होणाऱ्या प्रमुख बाबींच्या महतीविषयीं निरनिराळ्या काळांतील निरनिराळ्या मानवी समाजांत एकमत अस्तित्वांत होतें कीं कसें? याचा जर ऐतिहासिक दृष्ट्या शोध केला तर आपणांस असें आढळून येईल कीं, या चार प्रमुख नीतिनियमांच्या विरुद्ध वर्तन करणें हें कित्येक मानवीसमाजांत नीतीविरुद्ध समजलें जात नसे. एखाद्या वस्तूचा तिच्या मालकास पत्ता लागूं न देतां मोठ्या शिताफीनें अपहार करणें हें काहीं लोकांत नीतिविरुद्ध समजलें जात नाही. उलट अशा रीतीनें दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करणाराचें कृत्य कांहीं मानवी समाजांत प्रशंसनीय समजलें जाऊन त्याची त्या कृत्याबद्दल वाहवा करण्यांत येते. एके काळी स्कॉटलंड देशांतील जमीनदारांच्या जमिनी खेडणाऱ्या कुळाच्या स्त्रीस प्रथम ऋतु प्राप्त झाला असतां जमीनदारानें प्रथम तिचा उपभोग घेणें हें अनीतीचें कृत्य समजलें जात नसे. कांही जातींत एकाद्याकडे पाहुणा आलेल्या माणसास संभोगार्थ स्वत:ची स्त्री देणें नीतिबाह्य समजलें जात नाहीं. निरनिराळ्या काळांतील निरनिराळ्या मानवी समाजांत प्रचलित असलेल्या नीतिविषयक कल्पनांचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला असतां, वरील प्रकार आपणांस आढळून येत असल्यामुळें त्रिकालाबाधित अशीं कांहीं नीतितत्त्वें अस्तित्वांत असतात, असें विधान करणें दुरापास्त आहे. सदासर्वकाळ एकरूप अशीं नीती-तत्त्वें निरनिराळ्या मानवी समाजांत आढळून येत नसल्यामुळें तीं. चल असून मानवी समाजांत घडणाऱ्या स्थित्यंतरास अनुरूप अशीं त्यांचीं रूपें बदलत असतात असें विधान करणें युक्त ठरेल.

मानवी समाजाच्या घटकरूपी अशा निरनिराळ्या व्यक्तींनीं आचरावयाची ही जी नीती, तीशिवाय मानवी समाजांत दुसऱ्या प्रकारची एक नीती अस्तित्वांत असते; तिला राजनीति ही संज्ञा आहे. या नीतीची उत्पत्ति, तिचा विकास व तिचें सामान्य स्वरूप या विषयींचें प्रथम थोडेंसें दिग्दर्शन करतों. राजनीती या शब्दाच्या अर्थांत गूढत्व असें कांहीं नाहीं. या शब्दाचा सरळ अर्थ ''राजा ही संज्ञा ज्या व्यक्तीस आहे, त्या व्यक्तीनें स्वत: आचरावयाचे, तसेंच त्याच्या नियंत्रणाखालीं असलेल्या प्रजेशीं व त्याच्या सभोंवतालच्या राजसत्ता धारण करणाऱ्या व्यक्तींशीं आचरावयाचे जे नियम ती राजनीती'' असा आहे.

राजनीतीची ही व्याख्या जरी आम्हीं केली आहे, तथापि प्राचीन भारतीय नीतिशास्त्राची परंपरा लक्षांत घेतां, राजनीती या संज्ञेचें कांहीं प्रयोजन नाहीं. आतांच आम्हीं राजनीतीची जी व्याख्या केली तींतील अर्थ व्यक्त करण्याकरितां भारतीय नीतिशास्त्र-वाङ्मयांत नुसती ''नीति'' अथवा त्या शब्दाचा पर्याय दंडनीति ही संज्ञा उपयोगांत आणीत असल्याचें आढळतें. स्मृतिग्रंथांत नीती अथवा दंडनिती ही संज्ञा न वापरतां, ''राजधर्म'' हा शब्द उपयोगांत आणलेला आढळतो. याज्ञवल्क्य-स्मृतींत राजधर्मप्रकरण हा स्वतंत्र भाग आहे. त्याचप्रमाणें मनुस्मृतीचे सातवे अध्यायाचे सुरवातीस ''राजधर्मान् प्रवक्ष्यामि'' असें म्हटलें आहे. राजनीतीवरील शुक्राच्या ग्रंथास राजनीती ही संज्ञा नसून नुसती नीती


२६/५/०८
१प्रु.

ही संज्ञा आहे. या शिवाय विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, शुक्रनीतीच्या तिसऱ्या अध्यायांत (श्लो. १ व ३२६) प्रस्तुत ''नीती'' या संज्ञेचा जो अर्थ आपण समजतों तिजविषयींचे सर्व नियम दिले आहेत. व या अध्यायाच्या सुरुवातीसच ''साधारण'' नीती ही संज्ञा उपयोगांत आणलेली आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, प्राचीन राजनीतीशास्त्रान्वयें स्मृतिग्रंथांत राजधर्म या संज्ञेनें उल्लेखिलेल्या नियमांस नुसती नीती व राजधर्माविरहित अन्य नीती-नियमांस साधारण नीति या संज्ञा उपयोगांत आणीत असत.

मानवी समाजाच्या उत्क्रांतीचें जर निरीक्षण केलें तर असें आढळून येतें की, ''राजा'' ही संज्ञा मानवी समाजाच्या बऱ्याच उत्क्रांत स्थितींत उदयास येते, प्रस्तुत काळीं पृथ्वीचे पाठीवरील रानटी अवस्थेंतील मानवी समाजाचें निरीक्षण केलें असतां, त्या समाजांतील व्यक्तींवर आपली सत्ता चालविणारा व त्यांना आपल्या आज्ञेप्रमाणें वागावयास लावणारा असा एक म्होरक्या असतो. असा म्होरक्यास राजा ही संज्ञा लावण्यांत येत नाहीं. रानटी अवस्थेंतील मानवी प्राणी आपली उपजीविका मुख्यत्वेंकरून वन्य पशूंची शिकार करून करतात. कृषि, व्यापार इत्यादि व्यवसायांचा त्यांच्यांत अभाव असतो. त्यामुळें घरें, ग्रामें, नगरें तयार करून त्यांत वस्ती करून राहण्याची आवश्यकता त्यांना भासत नाहीं. स्वत:चें परशत्रूपासून रक्षण करणें या एका मुख्य हेतूस्तव आपल्यापैकीं एखाद्या कर्तबगार व समाजांतील बहुसंख्य व्यक्तींवर आपली सत्ता चालविण्यास समर्थ अशा व्यक्तीचे हुकमतीखालीं राहण्यास त्या समाजांतील लोक स्वखुषीनें तयार होतात. अशा प्रकारच्या व्यक्तीस त्या समाजाचा म्होरक्या समजण्यांत येतें. परंतु त्यास राजा ही पदवी प्राप्त होत नाही. अशा प्रकारच्या रानटी समाजाचे व्यवहार अगदीं साधे व बिनभानगडीचे असतात. या प्रकारच्या रानटी समाजाची वन्यावस्था नष्ट होत जाऊन कृषि, व्यापार, गृहस्थापना, ग्रामस्थापना इत्यादि गोष्टी त्या समाजांत जसजशा उदयास येऊं लागतात, तसतशी त्या रानटी मानवसमाजाच्या म्होरक्याच्या व्यवहारांत विविधता व ते व्यवहार चालविण्याचे पद्धतींत बिकटपणा येत जातो. अशा प्रकारें उत्क्रांत झालेल्या समाजाच्या म्होरक्यास ''राजा'' ही संज्ञा प्राप्त होते. ''राजा'' ही संज्ञा प्राप्त झालेल्या मानवी समाजाच्या पुढाऱ्यास त्या समाजाच्या समष्टिदृष्ट्या व त्या समाजांतील व्यक्तिदृष्ट्या, त्याचप्रमाणें त्या समाजाच्या सभोंवार असणाऱ्या अन्य मानवी समाजांच्या समष्टिदृष्ट्या व व्यक्तिदृष्ट्या नानाविध कर्मे करावीं लागतात. हीं नानाविध कर्मे करण्यासंबंधींचे जे नियम अथवा धर्म यांचे समुच्चायास ''राजनीति'' ही संज्ञा आहे. राजनीतींत अंतर्भूत होणारे हे नियम, पृथ्वीचे पाठीवरील निरनिराळ्या मानवी समाजांच्या इतिहासाचें निरीक्षण केलें असतां सदासर्वदा एकस्वरूपी असल्याचें दिसून येत नाहीं. काल व परिस्थितीची भिन्नता या उपाधींचे योगानें राजनीतींत अंतर्भूत होणाऱ्या निरनिराळ्या काळांतील व निरनिराळ्या समाजांतील नियमांची भिन्नता अधिक प्रमाणांत आढळून येते व याच कारणास्तव सुभाषितकारांनीं राजनीतीस वारांगनेची उपमा दिलेली आहे. राजनीतीचें रूप वारांगनेसारखें असल्यामुळें एकाद्या विवक्षित काळांत व एकाद्या विवक्षित मानवी समाजांत राजानें केलेलें एखादें कृत्य राजनीतिदृष्ट्या श्लाघ्य ठरलें, तर तेंच कृत्य भिन्न

काळीं व भिन्न मानवी समाजांत खात्रीनें श्लाघ्य ठरेलच असें म्हणतां येणार नाहीं. शुक्रनीतीच्या पुढील वचनांत राजनीतीच्या या स्वरूपविशेषाचें दिग्दर्शन केलेलें आहे, तें असें-

*सर्वं पापं धर्मरूपं स्थितमाश्रयभेदत: ।। ३५ ।।*
*बहुभिर्यस्स्तुतो धर्मो निंदितोऽधर्म एव स: ।*
*धर्मतत्त्वं हि गहनं ज्ञातुं केनापि नोचितं ।।३६ ।।*

*शु. नी. अ. ५*

अर्थ- परिस्थितींत बदल झाल्यानें पापकर्म हें सत्कृत्य समजलें जातें. बहुसंख्य लोक चांगले समजतात तो धर्म व वाईट समजतात तो अधर्म होय. नीतिशास्त्र हें फार गहन आहे, व तें समजण्याची पात्रता फार थोड्या लोकांच्या ठाई असते.

शुक्राच्या या वचनांवरून राजनीतीच्या तत्त्वांची अस्थिरता किती आहे हें दिसून येतें.

काळ व परिस्थिती यांच्या भेदामुळें विशिष्टकाळांत व परिस्थितींत कार्यक्षम ठरलेला राजनीतीचा नियम भिन्न काळ व परिस्थिती यांत कार्यक्षम होत नाहीं. म्हणूनच इष्टफलाचे प्राप्तीस्तव नूतन राजनीतीच्या नियमांचा नीतिपारंगत पुरुष अवलंब करितात. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां, राजनीतीच्या तत्त्वांची स्थिरता फार थोडी संभवते. शुक्रनीतीच्या खालील वचनांत हें तत्त्व ग्रथित केलेलें आढळतें.

*अस्ति बुद्धिमतां श्रेणिर्न त्वेको बुद्धिमानत: ।। ६६ ।।*
*देशे काले च पुरुषे नीतिं युक्तिमनेकधा ।।*
*कल्पयंति च तद्विद्यां दृष्ट्वा रुद्धां तु प्राक्तनां ।। ६७ ।।*

*शु. नी. अ. ५*

अर्थ- बुद्धिमान् पुरुष एकएकटे असत नाहींत, तर त्यांचे गट असतात. काळ, स्थळ आणि परिस्थिति यांस अनुसरून एखादें जुनें राजनीतीचें तत्त्व निरुपयोगी आहे असें ठरल्यास नीतिशास्त्र-पारंगत पुरुष युक्ति आणि नीति यांचा आश्रय करून नूतन राजनीतीच्या तत्त्वाची योजना करतात.

महाभारतांत निरनिराळ्या राजनीतींचें वर्णन केलें आहे. तें वरवर वाचणारासही एका राजनीती अन्वयें श्लाघ्य समजली जाणारी गोष्ट दुसऱ्या एका नीती अन्वयें त्याज्य समजली जाते असें दिसून येईल. आपला शत्रु आपल्या हातीं सांपडला असतां त्यास जीवदान देऊन सोडून द्यावें असें एका नीतींत सांगितलें आहे. या नीतितत्त्वास अनुसरून भारतीय राजा पृथ्वीराज चव्हाण यानें आपला शत्रू महमद घोरी हा युद्धांत स्वात:चे हातीं सांपडला असतां त्यास जीवदान देऊन सोडून दिल्याचें इतिहासांत प्रसिद्ध आहे. परंतु महाभारतांतर्गत दुसऱ्या एका नीतींत आपला शत्रू आपल्या हातीं सांपडला असतां त्यास ठार करावें, इतकेंच नाहीं, तर त्याच्या सर्व कुलाचा उच्छेद करून त्याचीं पाळेंमुळें


२६/५/०८
१प्रु.

खणून नाहींशीं करावीं असें सांगितलें आहे. या राजनीतीच्या नियमास अनुसरून शिवाजीनें जावळींच्या चंद्रराव मोऱ्याच्या कुळाचीं सर्व पाळेंमुळें खणून त्याचा उच्छेद केल्याचें इतिहासांत लिहिलेलें आहे. शुक्रनीतीच्या दुसऱ्या अध्यायांत खालील वचन आढळतें.

*सुदुर्वृत्तास्तु दायादा हन्तव्यास्ते प्रयत्नत: ।*
*व्याघ्रादिभि: शत्रुभिर्वा छलै राष्ट्रविवृद्धये ॥ २८ ॥*

अर्थ- राजाचे भाऊबंद जर दुष्ट स्वभावाचे असतील, तर व्याघ्रादि हिंस्त्र पशु अगर शत्रु यांचेकडून किंवा कपटानें त्यांचा नाश राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं करवावा.'' सामान्य नीतिनियमान्वयें स्वत:च्या कुटुंबांतील नात्यागोत्याच्या व्यक्तींचा नाश करणें हें अत्यंत गर्हणीय समजलें जातें! परंतु राजनीतीअन्वयें ही गोष्ट युक्त मानण्यांत येते हें वरील वचनांवरून स्पष्ट दिसतें. एकच स्वरूपाचें कृत्य सामान्य नीतीअन्वयें जें गर्हणीय ठरतें, तेंच राजनीतीअन्वयें दोषास्पद समजलें जात नाहीं. याचीं आणखी कांहीं उदाहरणें प्रस्तुत स्थळीं देण्याजोगीं आहेत. एकाद्या माणसाच्या मालमत्तेचा नाश करणे हें सामान्य नीतीच्या विरुद्ध आहे. परंतु हेंच कृत्य विशिष्ट परिस्थितींत राजनीतीच्या योग्य ठरतें. शत्रूनें एकाद्या राष्ट्रावर स्वारी केल्यास त्या राष्ट्रांतील लोकांच्या जमिनींतील पिकें शत्रूचे हातीं पडून त्यास त्यांचा उपयोग होऊं नये, म्हणून तीं नाहींशीं करणें हें कृत्य सामान्य नीतीअन्वयें कितीही गर्हणीय असलें तरी राजनीतीदृष्ट्या योग्य समजलें जातें. स्वराष्ट्राच्या सुरक्षितपणाकरितां शेजारच्या राजाचा मुलूख जबरदस्तीनें बळाकावणें राजनीतीदृष्ट्या जरी योग्य समजलें जातें; तरी हेंच कृत्य एकाद्या सामान्य व्यक्तीनें वैयक्तिक स्वार्थ साधण्यास्तव केलें तर तें नीति-बाह्य समजलें जातें. एकाद्या राष्ट्रांतील शेतकऱ्यानें स्वत:च्या शेतांत तयार केलेल्या पिकांचा अपहार त्याच्या शेजारच्या शेतकऱ्यानें करणें नीतिविरुद्ध समजलें जातें; परंतु एकाद्या राष्ट्रावर परचक्र आलें असतां, शत्रूंशीं लढण्यास लागणारें द्रव्य त्या राष्ट्राच्या राजापाशीं नसल्यास स्वराष्ट्रांतील शेतकऱ्यांनीं त्यांच्या शेतांत तयार केलेलीं पिकें राजानें जबरदस्तीनें ताब्यांत घेणें राजनीतिदृष्ट्या योग्य समजण्यांत येतें. बार्हस्पत्य अर्थशास्त्राच्या पहिल्या अध्यायांत ''धर्ममपि लोकविक्रुष्टं न कुर्यात् ।'' असें एक सूत्र आहे. धर्म्य गोष्ट असली तथापि ती प्रजेस जर अप्रिय असली तर ती राजानें करूं नये, असा या सूत्राचा अर्थ आहे. सामान्य नीति आणि राजनीति यांत किती मोठें अंतर आहे हें या सूत्रावरून कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. व्यक्तिदृष्ट्या जी गोष्ट धर्म्य आहे, ती करणें हें सामान्य नीतिनियमास अनुरूप आहे; परंतु राजनीतिदृष्ट्या प्रजेचा क्षोभ ज्या गोष्टीनें होईल ती धर्म्य असली तरी न करणें हेंच उचित ठरतें. या सूत्रासारखेंच याच अध्यायांत ८६ वें सूत्र आहे.

*''धर्मगुप्ति: गृहयात्रा गुप्ति:, कार्यगुप्ति: वैरगुप्ति:*
*यशोभङ्गे सत्यमपि नेति वदेत् ॥ ८६ ॥''*

राजानें धर्माविषयी, गृहांत राहाण्याविषयी, अगर गृह सोडून परठिकाणीं जाण्याच्या संकल्पाविषयीं कोणतेंही कृत्य करण्याचें ठरविलें असेल त्याविषयी व आपले शत्रु कोण आहेत याविषयीं गुप्तपणा ठेवावा व आपल्या इभ्रतीस कमीपणा न यावा म्हणून असत्य बोलावें'' असा या सूत्राचा अर्थ आहे. सत्य बोलणें हें सामान्य नीतीचें तत्त्व समजलें जातें, हें जरी खरें असलें, तरी या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें स्वत:ची इभ्रत राखण्याकरितां राजानें खोटें बोलणें राजनीतीविरुद्ध समजले जाते नाही, अशाच प्रकारच्या दुसऱ्या कांही उदाहरणांवरून सामान्य नीती व राजनीती यांत केवढें मोठें अंतर आहे हें स्पष्ट करून दाखवितां येण्यासारखें आहे.

*नीतिवियुक्तः पुत्र इव शत्रुः।*

*बृ. अ. श्लोक ५०*

अर्थ- 'राजकीय धोरणाच्या विरुद्ध असलेला स्वत:चा पुत्र शत्रु समजावा.' या बृहस्पतीचे वचनांत अंतर्भूत केलेलें तत्त्व सामान्य नीतीच्या विरुद्ध आहे. सत्य बोलणें हा जरी परमधर्म समजला आहे तथापि

*सत्यमपि दुःखानर्थसाधनमपि न वदेत् ।।*

असें बृहस्पतीचें राजनीतीचें वचन आहे. सत्य बोलण्याने जर दु:ख अगर दुर्दैव असें बृहस्पतीचें राजनीतीचें वचन आहे. सत्य बोलण्याने जर दु:ख अगर दुर्दैव ओढवत असेल तर राजाने सत्य बोलूं नये असें या वचनांत सांगितलें आहे. अशा प्रकारच्या वचनांवरून सामान्य नीती आणि राजनीती यांचा विरोध स्पष्टपणें दिसून येतो.

ज्या शिवाजीच्या राजनीतीचें विवेचन प्रस्तुत ग्रंथांत करावयाचें आहे तो ज्या भरतखंडांत उदयास आला त्या आपल्या या देशांत राजनीतिविषयक वाङ्मयाचा उगम किती प्राचीन काळीं झाला, त्याचा विकास कसकसा होत गेला व शिवाजीनें आपली राजनीति कोणत्या धोरणास अनुसरून ठरविली, इत्यादि मुद्द्यांची चचा एथें करणें ओघानेंच प्राप्त आहे. आपल्या ह्या भरतखंडांत राजनीती-विषयक वाङ्मयाचा उगम फार प्राचीन काळीं म्हणजे सुमारें ३-४ हजार वर्षांपूर्वी झालेला आहे. महाभारताचे शांतिपर्वात राजनीतीविषयक वाङ्मयाचा उगम व विकास या विषयाची माहिती सविस्तर दिली आहे. अगदीं अलीकडे चंद्रगुप्त मौर्यांचे काळीं चाणक्यानें (कौटिल्यानें) अर्थशास्त्र या नांवाचा राजनीतिपर ग्रंथ ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत रचलेला उपलब्ध झाला आहे. या ग्रंथांतील उल्लेखांवरून फार प्राचीन काळीं भरतखंडांत राजनीतिशास्त्रांतर्गत निरनिराळीं मतें प्रतिपादन करणारे ग्रंथ व त्यांचे अध्वर्यु अस्तित्वांत होते. मानव, बार्हस्पत्य, औशनीय, अंभीय, पाराशर्राय या नांवांनीं संबोधिले जाणारे भिन्न स्वरूपाचे राजनीतिशास्त्रविषयक पंथ त्या काळीं अस्तित्वांत असल्याचें दिसून येतें. या शिवाय भारद्वाज, विशालाक्ष, पिशुन, कौनपदंत, वातव्याधि व बहुदंतीपुत्र, यांचींही नांवें महाभारतांत राजनीतिशास्त्रावर ग्रंथ रचणारे म्हणून उल्लेखिलेलीं आढळतात. अग्निपुराणांत राजनीतीचें

विवरण केलेलें आहे. सोमदेवाचें नीतिवाक्यामृत व शुक्राचार्यकृत शुक्रनीतिसार हे राजनीतिपर प्रसिद्ध ग्रंथ असून यांत राजनीतींत अंतर्भूत होणाऱ्या निरनिराळ्या विषयांचें विवेचन केलेलें आढळतें. इ. स. ११२९ सालांत चालुक्य घराण्यांतील सोमेश्वरविरचित अभिलाषितार्थचिंतामणि या नांवाचा महाराष्ट्रांत रचलेला राजनीतिपर ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे शंभर अध्याय असून पांच विंशतींत या अध्यायांची वांटणी करण्यांत आलेली आहे. राज्यसंपादन करण्याच्या साधनांविषयीं विवेचन या ग्रंथांत आलें आहे. या राजनीतिविषयक वाङ्मयाशिवाय मनु व याज्ञवल्क्य यांच्या स्मृतींत राजधर्मप्रकरणांत राजनीतींत अंतर्भूत होणाऱ्या निरनिराळ्या विषयांचें विवरण केलेलें आहे. यावरून राजनीति-विषयक वाङ्मयाचा विकास ज्या आपल्या राष्ट्रांत प्राचीन काळींच झाला होता; त्यांतच शिवाजीचा जन्म व त्याच्या चारित्र्याचा विकास झाला ही गोष्ट त्याच्या राजनीतीच्या स्वरूपाचें जें विवेचन या ग्रंथाच्या पुढील भागांत करण्यांत आलें आहे, तें वाचतांना वाचकांनीं ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

भरतखंडात राजनीतिविषयक वाङ्मयाची उत्पत्ति व विकास केव्हा व कसा झाला याचें दिग्दर्शन केल्यानंतर, या विषयावरील वाङ्मय निर्माण करणाऱ्या भारतीय विद्वानांच्या मतान्वयें राजनीतिशास्त्रांत कोणकोणत्या विषयांचा समावेश केला जातो याचा उल्लेख प्रस्तुत स्थळीं करणें अवश्य आहे. महाभारताच्या शांतीपर्वाच्या ५९ व्या अध्यायांत राजनीतींत अंतर्भूत होणाऱ्या निरनिराळ्या विषयांचें व या शास्त्रावर ग्रंथ रचणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींचें खालील प्रमाणें वर्णन केलें आहे. त्याचें आम्ही या ठिकाणी मूळ व भाषांतर देतों.

*तानुवाच सुरान् सर्वान् स्वयंभूर्भगवांस्तत: ॥*
*श्रेयोऽहं चिंतयिष्यामि व्येतु वौ भी: सुरर्षभा: ॥ २८ ॥*
*ततोऽध्यायसहस्राणं शतं चक्रे स्वबुद्धिजम् ॥*
*यत्र धर्मस्तथैवार्थ: कामश्वैवाभिवर्णित: ॥ २९ ॥*
*त्रिवर्ग इति विख्यातो गण एष स्वयंभुवा ॥*
*चतुर्थो मोक्ष इत्येव पृथगर्थ: पृथग्गुण: ॥ ३० ॥*
*मोक्षस्यास्ति त्रिवर्गोन्य: प्रोक्त: सत्वं रजस्तम: ॥*
*स्थानं वृद्धि: क्षयश्चैव त्रिवर्गश्चैव दंडज: ॥ ३१ ॥*
*आत्मा देशश्च कालश्चाप्युपाया: कृत्यमेव च ॥*
*सहाया: कारणं चैव षड्वर्गो नीतिज: स्मृत: ॥ ३२ ॥*
*त्रयी चान्वीक्षिकी चैव वार्ता च भरतर्षभ ॥*
*दंडनीतिश्च विपुला विद्यास्तत्र निदर्शिता: ॥ ३३ ॥*
*अमात्यरक्षा प्रणिधी राजपुत्रस्य लक्षणम् ॥*
*चारश्च विविधोपाय: प्रणिधेय: पृथग्विध: ॥ ३४ ॥*
*सामभेद: प्रदानं च ततो दंडश्च पार्थिव ॥*
*उपेक्षा पंचमी चात्र कात्स्न्येंन समुदाहृता ॥ ३५ ॥*

मंत्रश्च वर्णित: कृत्स्नस्तथा भेदार्थ एव च ॥
विभ्रमश्चैव मंत्रस्य सिध्यसिध्योश्च यत्फलम् ॥ ३६ ॥
संधिश्च त्रिविधाभिख्यो हीनो मध्यस्तथोत्तम: ॥
भयसत्कारवित्ताख्यं कार्त्स्न्येन परिवर्णितम् ॥ ३७ ॥
यात्रा कालाश्च चतरस्त्रिवर्गस्य च विस्तर: ॥
विजयो धर्मयुक्तश्च तथार्थविजयश्च ह ॥ ३८ ॥
आसुरश्चैव विजयस्तथा कार्त्स्न्येन वर्णित: ॥
लक्षणं पञ्चवर्गस्य त्रिविधं चात्र वर्णितम् ॥ ३९ ॥
प्रकाशश्चाप्रकाशश्च दंडोऽथ परिशब्दित: ॥
प्रकाशोष्टविधस्तत्र गुह्यश्च बहुविस्तर: ॥ ४० ॥
रथा नागा हयाश्चैव पादाताश्चैव पांडव ॥
विष्टिनावश्चराश्चैच देशिका अति चाष्टमम् ॥ ४१ ॥
अङ्गान्येतानि कौरव्य प्रकाशानि बलस्य तु ॥
जङ्गमाजङ्माश्चोक्ता श्चूर्णयोगा विषादय: ॥ ४२ ॥
स्पर्शे चाभ्यवहार्ये चाप्युपांशुर्विविध: स्मृत: ॥
अरिर्मित्र उदासीन इत्येतेऽप्यनुवर्णिता: ॥ ४३ ॥
कृत्स्ना मार्गगुणाश्चैव तथा भूमिगुणाश्च ह ॥
आत्मरक्षणमाश्वास: सर्गाणां चान्ववेक्षणम् ॥ ४४ ॥
कल्पना विविधाश्चापि नृनागरथघाजिनाम् ॥
व्यूहाश्च विविधाभिख्या विचित्रं युद्धकौशलम् ॥ ४५ ॥
उत्पाताश्च निपाताश्च सुयुद्धं सुपलायितम् ॥
शस्त्राणां पालनं ज्ञानं तथैव भरतर्षभ ॥ ४६ ॥
बलव्यसनयुक्तं च तथैव बलहर्षणम् ॥
पीडा चापदकालश्च पत्तिज्ञानंच पांडव ॥ ४७ ॥
तथाख्यातविधानं च योग: संचार एव च ॥
चोरैराटविकैश्चोग्रै: परराष्ट्रस्य पीडनम् ॥ ४८ ॥
अग्निदैर्गरदैश्चैव प्रतिरूपककारकै: ॥
श्रेणिमुख्योपजापेन वीरूधश्छेदनेन च ॥ ४९ ॥
दूषणेन च नागानामाङ्तक जननेन च ॥
आराधनेन भक्तस्य प्रत्ययोपार्जनेन च ॥ ५० ॥
सप्ताङ्गस्य च राज्यस्य ऱ्हासवृद्धिसमञ्जसम् ॥
दूतसामर्थ्यसंयोगात्सराष्ट्रस्य विवर्धनम् ॥ ५१ ॥
अरिमध्यस्थमित्राणां सम्यक् चोक्तं प्रपञ्चनम् ॥
अवमर्द: प्रतीघातस्तथैव च बलीयसाम् ॥५२॥
व्यवहार: सुसूक्ष्मश्च तथा कण्टकशोधनम् ॥


२६/५/०८
१प्रु.

श्रमो व्यायामयोगश्च त्यागो द्रव्यस्य संग्रह: ।।५३।।
अभृतानां च भरणं भृतानां चान्ववेक्षणम् ।।
अर्थस्य काले दानं च व्यसने चाप्रसंगिता ।।५४।।
तथा राजगुणाश्चैव सेनापतिगुणाश्च ह ।।
कारणं च त्रिवर्गस्य गुणदोषास्तथैवच ।।५५।।
दुश्चेष्टितं च विविधं वृत्तिश्चैवानुवर्तिनाम् ।।
शङ्कितत्वं च सर्वस्य प्रमादस्य च वर्जनम् ।।५६।।
अलब्धलाभो लब्धस्य तथैवच विवर्धनम् ।।
प्रदानंच विवृद्धस्य पात्रेभ्यो विधिवत्तत: ।।५७।।
विसर्गोऽर्थस्य धर्मार्थ कामहैतुकमुच्यते ।।
चतुर्थव्यसनाघाते तथैवात्रानुवर्णितम् ।।५८।।
क्रोधजानि तथोग्राणि कामजानि तथैव च ।।
दशोक्तानि कुरुश्रेष्ठ व्यसनान्यत्र चैव ह ।।५९।।
मृगयाऽक्षास्तथा पानं स्त्रियश्च भरतर्षभ ।।
कामजान्याहुराचार्या: प्रोक्तानीह स्वयंभुषा ।।६०।।
वाक्पारुष्यं तथोग्रत्वं दंडपारुष्यमेव च ।।
आत्मनो निग्रहस्त्यागो ह्यर्थदूषणमेव च ।।६१।।
यंत्राणि विविधान्धेव क्रियास्तेषां च वर्णिता: ।।
अवमर्द: प्रतिघात: केतनानांच भञ्जनम् ।।६२।।
चैत्यद्रुमावमर्दश्च रोध: कर्मानुशासनम् ।।
अपस्करोऽथ वसनं तथोपायाश्व वर्णिता: ।।६३।।
पणवानक शङ्खानां भेरीणां च युधिष्ठिर ।।
उपार्जनं च द्रव्याणां परिमर्दश्च तानि षट् ।।६४।।
लब्धस्य च प्रशमनं सतां चैवाभिपूजनम् ।।
विद्वद्भिरेकीभावश्च दानहोमविधिज्ञता ।।६५।।
मङ्गलालम्भनं चैव शरीरस्य प्रतिक्रिया ।।
आहारयोजनं चैव नित्यमास्तिक्यमेव च ।।६६।।
एकेन च यथोत्थेयं सत्यत्वं मधुरा गिर: ।।
उत्सवानां समाजानां क्रिया: केतनजास्तथा ।।६७।।
प्रत्यक्षाश्च परोक्षाश्च सर्वाधिकरणेष्वथ ।।
वृत्तेर्भरतशार्दूल नित्यं चैवान्ववेक्षणम् ।।६८।।
अदण्ड्यत्वं च विप्राणां युक्त्या दण्डनिपातनम् ।।
अनुजीवी स्वजातिभ्यो गुणेभ्यश्च समुद्भव: ।।६९।।
रक्षणं चैव पौराणां राष्ट्रस्य च विवर्धनम् ।।
मण्डलस्था च या चिन्ता राजद्वादशराजिका ।।७०।।

*द्वासप्ततिविधा चैव शरीरस्य प्रतिक्रिया ॥*
*देशजातिकुलानां च धर्माः समनुवर्णिताः ॥७१॥*
*धर्मश्चार्थश्च कामश्च मोक्षश्चान्नानुवर्णिताः ॥*
*उपायाश्चार्यलिप्सा च विविधा भूरिदक्षिण ॥७२॥*
*मूलकर्मक्रिया चात्र मायायोगश्च वर्णितः ॥*
*दूषणं स्रोतसां चैव वर्णितं चास्थिरांभसाम् ॥७३॥*
*यैर्यैरुपायैर्लोकस्तु न चलेदार्यवर्त्मनः ॥*
*तत्सर्वं राजशार्दूल नीतिशास्त्रेऽभिवर्णितम् ॥७४*
*एतत्कृत्वा शुभं शास्त्रं ततः स भगवान्प्रभुः ॥*
*देवानुवाच सहृष्टः सर्वाञ्छक्रपुरोगमान् ॥७५॥*
*उपकाराय लोकस्य त्रिवर्गस्थापनाय च ॥*
*नवनीतं सरस्वत्या बुद्धिरेषा प्रभाविता ॥७६॥*
*दण्डेन सहिता ह्येषा लोकरक्षणकारिका ॥*
*निग्रहानुग्रहरता लोकाननुचरिष्यति ॥७७॥*
*दण्डेन नीयते चेदं दण्डं नयति वा पुनः ॥*
*दण्डनीतिरिति ख्याता त्रिन्लोकानभिवर्तते ॥७८॥*
*षाड्गुण्यगुणसारैषा स्थास्यत्यग्रे महात्मसु ॥*
*धर्मार्थकाममोक्षाश्च सकला ह्यत्र शब्दिताः ॥७९॥*
*ततस्तां भगवान्नीतिं पूर्वं जग्राह शंकरः ॥*
*बहुरूपो विशालाक्षः शिवः स्थाणुरुमापतिः ॥८०॥*
*प्रजानामायुषो ऱ्हासं विज्ञाय भगवाञ्शिवः ॥*
*सञ्चिक्षेप ततः शास्त्रं महास्त्रं ब्रह्मणा कृतम् ॥८१॥*
*वैशालाक्षमिति प्रोक्तं तदिंद्रः प्रत्यपद्यत ॥*
*दशाध्यायसहस्राणि सुब्रह्मण्यो महातपाः ॥८२॥*
*भगवानपि तच्छास्त्रं सञ्चिक्षेप पुरंदरः ॥*
*सहस्त्रैः पञ्चभिस्तात यदुक्तं बाहुदंतकम् ॥८३॥*
*अध्यायानां सहस्त्रेतु त्रिभिरेव बृहस्पतिः ॥*
*सञ्चिक्षेपेश्वरो बुद्ध्या बार्हस्पत्यं तदुच्यते ॥८४॥*
*अध्यायानां सहस्त्रेण काव्यः संक्षेपमब्रवीत् ॥*
*तच्छास्त्रममितप्रज्ञो योगाचार्यो महायशाः ॥८५॥*
*एवं लोकानुरोधेन शास्त्रमेतन्महर्षिभिः ॥*
*संक्षिप्तमायुर्विज्ञाय मर्त्यानां ऱ्हासमेव च ॥८६॥*
*श्रीमन्महाभारत शांतिपर्व अ. ५९*

अर्थ- हे ऐकून भगवान् ब्रह्मदेव त्या सर्व देवांना म्हणाले, 'हे सुरश्रेष्ठ हो, आपण

भीति सोडून द्या. मी तुमच्या कल्याणाविषयींचा विचार करितो' असें म्हणून त्यानें स्वत:च्या बुद्धीनें एक लक्ष अध्याय निर्माण केले. त्यांमध्यें त्रिवर्ग या नांवानें प्रख्यात असलेल्या धर्म, अर्थ आणि काम या तिहींचें ब्रह्मदेवानें वर्णन केलेलें आहे; व त्यांजहून निराळा उद्देश आणि निराळा गुण असलेला मोक्ष या नांवाचा जो चौथा पुरुषार्थ त्याचेंही वर्णन केलेलें आहे. मोक्षाचा त्रिवर्ग, पूर्वी सांगितलेल्या त्रिवर्गाहून भिन्न सांगितलेला आहे. तो सत्त्व, रज आणि तम हा होय. शिवाय, आहे त्या स्थितींत राहाणें, अभ्युदय होणें व क्षय होणें, हा दंडजन्य त्रिवर्ग होय. अंत:करण, देश, काल, साधनें, फल, साहाय्यकर्ते आणि कारण हा नीतिजन्य षड्वर्ग होय. हे भरत-कुलश्रेष्ठा, ब्रह्मदेवानें केलेल्या त्या लक्ष अध्यायांमध्यें कर्मकांड, ज्ञानकांड, कृषि, व्यापार इत्यादि उपजीविकेचें प्रकरण आणि प्रजापालन या विद्या विस्तृतपणें सांगितलेल्या आहेत. अमात्याचें संरक्षण करण्यासाठीं ठेवावयाचे गुप्त हेर, राजपुत्राचीं लक्षणें व ते जे गुप्त हेर ठेवावयाचे त्यांचे नाना प्रकारचे वेष व निरनिराळे प्रकार हेंही त्यांत सांगितलेले आहेत. तसेंच हे पृथ्वीपते, ह्या ग्रंथामध्यें साम, दाम, दंड, भेद आणि पांचवी उपेक्षा हीं पूर्णपणें सांगितलेलीं आहेत. सर्व प्रकारचे गुप्त विचार, शत्रुपक्षांत भेद उत्पन्न करण्यासाठीं करावयाचे गुप्त विचार, त्यामध्यें पडणारा श्रम, तो विचार सिद्ध झाल्यास अथवा न झाल्यास मिळणारें फळ, निकृष्ट, मध्यम आणि उत्तम असा तीन प्रकारचा संधि व नीति, सरकार आणि द्रव्य हीं त्यांचीं कारणें ह्यांचें त्यांत पूर्णपणें वर्णन केलेलें आहे. चार प्रकारचे स्वारी करण्याचे काळ, विस्तृत असा त्रिवर्ग, धर्मविषयक विजय व आसुरविजय यांचेंही त्यांत पूर्णपणें वर्णन आहे. अमात्य, राष्ट्र, दुर्ग, बल आणि कोश या पंच वर्गांचीं उत्तम, मध्यम आणि निकृष्ट अशीं तीन प्रकारचीं लक्षणें त्यांत वर्णिलेलीं आहेत. प्रकट आणि अप्रकट अशा दोहों प्रकारच्या सैन्यांचें त्यांत वणन केलेलें आहे. त्यांपैकीं प्रकट सैन्याचे प्रकार आठ असून गुप्त सैन्याच्या प्रकारांचा पुष्कळ विस्तार आहे. हे कुरुकुलोत्पन्ना, रथ, गज, अश्व, पदाति, विष्टि (वेढे), नौका, गुप्त हेर आणि धर्मोपदेशक हीं प्रकट सैन्याचीं आठ अंगें त्यांत सांगितलेलीं आहेत. जंगम आणि स्थावर विषादिकांच्या चूर्णांची स्पर्श करावयाच्या पदार्थांमध्यें व अन्नामध्यें करावयाची योजना, नाना प्रकारचे जारणमारणादि गुप्त उपाय व शत्रु, मित्र आणि उदासीन ह्यांचीं लक्षणेंही त्यांमध्यें दिलेलीं आहेत. ग्रह-नक्षत्रादिकांच्या मार्गांचीं फळें, भूमीचे गुण, आत्मसंरक्षण, आंस्वासन, कारखान्यांचें निरीक्षण करणें, मनुष्यें, गज, रथ आणि अश्व, त्यांच्या दृढतेचे आणि पुष्टीचे अनेक योग, नाना प्रकारचीं नांवें असलेले व्यूह, विलक्षण युद्धचातुर्य, धूमकेतू-प्रभृति उत्पात, उल्कापातादिक निपात, उत्कृष्ट प्रकारचें युद्ध, शुभकारक पलायन, शस्त्रांना धार देण्याचा प्रकार, तसेंच हे भरतकुलश्रेष्ठा, सामर्थ्य आणि संकट या संबंधींचें ज्ञान, सैन्याला आनंदित ठेवण्याचा प्रकार, पीडा व अनेक संकटें यांचा समय, पायदळांची विद्या, अभिमंत्रित अशा दुंदुभीच्या ध्वनीवरून प्रयाणादिक फलें सांगण्याचा प्रकार, पताकादिक आणि मंत्रादिक असा दोहों प्रकारच्या योगांच्या दर्शनानें व श्रवणानें शत्रूला मोह उत्पन्न करण्याचा प्रकार, चोर व अरण्यामध्यें वास्तव्य करणारे भयंकर लोक यांजकडून शत्रूंच्या

राष्ट्रास पीडा देणें, अग्नि लावणारे, विष देणारे, प्रतिबिंब उठविणारे, इ. निरनिराळ्या वर्गांतील मुख्य मुख्य मनुष्यांत फाटाफूट करून हत्तींना पिसाळून अथवा त्यांच्या शरीरांत रोग उत्पन्न करून व आपल्यावर प्रेम करणाऱ्या मनुष्याचा बहुमान करून व त्याचा आपल्यावर विश्वास बसवून घेऊन शत्रूच्या राष्ट्राला पीडा कशी द्यावी हेंही त्यांत सांगितलेलें आहे. सात अंगांनीं युक्त असलेल्या राजाचा ऱ्हास, वृद्धि, समता, यांचें स्वरूप, दूत आणि सामर्थ्य यांचे योगानें स्वराष्ट्राची वृद्धि करण्याचा प्रकार, आणि शत्रु, मध्यस्थ व मित्र ह्यांच्या स्वरूपाचा विस्तार हींही त्यांत वर्णिलीं आहेत. अत्यंत बलवान् अशाही शत्रुंशीं युद्ध करणें व त्यांजवर उलट मारा करणें, विवादांचा अत्यंत सूक्ष्म विचार, दुष्ट लोकांचें निर्मूलन, व्यायाम, शस्त्रास्त्रयोग करण्याचा अभ्यास, दान, द्रव्यसंग्रह, पोषण न होणाऱ्यांचें पोषण करणें व पोषण होत असेल त्यांचा परामर्श घेणें, योग्य वेळीं द्रव्यदान करणें व व्यसनामध्यें आसक्त नसणें ह्याही गोष्टी त्यांत सांगितल्या असून, राजाचे व सेनापतीचे सर्व गुण धर्मादि तीन पुरुषार्थांचें साधन व त्यांतील गुणदोष, नाना प्रकारचे दुराचार, सेवकांना द्यावयाचें वेतन, सर्वांचाही संशयितपणा, प्रमादाचा त्याग, प्राप्त न झालेलें द्रव्य मिळवणें, मिळविलेलें वाढविणें, आणि नंतर वाढविलेल्या द्रव्याचें सत्पात्र लोकांना दान करणें, अर्ध्या द्रव्याचें धर्मकृत्यासाठीं दान करणें,तिसऱ्या चतुर्थांशाचा आपल्या इच्छेप्रमाणें विनियोग करणें व चौथ्या चतुर्थांशाचा संकटप्रसंगी व्यय करणें, ह्याही गोष्टींचें त्यांत वर्णन केलेलें आहे. हे कुरुश्रेष्ठा, क्रोधज आणि कामज अशीं भयंकर दहा व्यसनेंही या ग्रंथांत सांगितलेलीं आहेत. हे कुरुकुल- श्रेष्ठा, मृगया, द्यूत, मद्यपान आणि स्त्रिया हीं जीं कामज व्यसनें आचार्यांनीं सांगितलेलीं आहेत, तीं ब्रह्मदेवानें या ग्रंथांत दिलीं असून कठोर शब्दांचा प्रयोग, उग्रत्व, कडक शिक्षा, मनोनिग्रह, द्रव्यासंबंधीं व्यसनें, नानाप्रकारचीं यंत्रें, त्यांच्या कृति यांचेंही त्यांत वर्णन आहे. आपल्या सैन्याकडून शत्रूच्या सैन्याला पीडा देणें, त्याजवर उलट मारामारी करणें, शत्रूच्या ध्वजादि चिन्हांचा भंग करणें, देवमंदिरें, आणि वृक्ष यांचा विध्वंस करणें, वेढा देणें, कार्य करण्याविषयींची आज्ञा, युद्धादिकांची साधनें, कवचादि वस्तु, आणि हे युधिष्ठिरा, पणव, आनक, शंख, भेरी इत्यादि वाद्यें तयार करण्याच्या युक्ति, रत्नें, पृथ्वी, पशु, वस्त्र, दासदासी आणि सुवर्ण ह्या सहा प्रकारच्या द्रव्यांचें संपादन व शत्रूंच्या द्रव्यांचा विध्वंस करणें, प्राप्त झालेल्या द्रव्याबद्दल शांति बाळगणें, सत्पुरुषांचा सन्मान करणें, विद्वानांशी ऐक्य ठेवणें, दान, होम या विषयींचें ज्ञान असणें, शुभकारक वस्तुंचा स्पर्श करणें, शरीर अलंकृत करणें, आहाराची योग्यता व सदैव आस्तिकपणें असणें याही सर्व गोष्टींचें त्यांत वर्णन आहे. एवढ्यानेंच उद्योग कसा करावा हेंही त्यांत सांगितलें असून, सत्यता, मधुर भाषण, उत्सवाविषयींचीं व समाजाचीं कर्तव्यें, गृहकृत्यें, सर्वही खात्यांतील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष गोष्टी व सदैव भृत्यादिकांच्या वर्तनाचें निरीक्षण, ब्राह्मणांची दंडास अपात्रता व त्यांना युक्तीनें शिक्षा करणें, आपल्या आधारावर उपजीविका करणें, आपल्या ज्ञातींतील लोक आणि सद्गुण ह्यांच्याच करितां ऐश्वर्याचें वस्तुत्व, पौरजनांचें संरक्षण, राष्ट्राचा विस्तार, राष्ट्रासंबंधानें, त्याच्या सभोंवतीं चोहों दिशांस असणाऱ्या, शत्रु, मित्र आणि उदासीन राजां

विषयींचा विचार, बारा प्रकारचे शरीरसंस्कार आणि देश, जाति व कुल यांचे धर्म, या ग्रंथामध्ये वर्णन केलेले आहेत. हे अत्यंत चातुर्यसंपन्न, यामध्यें धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ, सामादिक उपाय आणि नाना प्रकारचें द्रव्य संपादनाचे उपाय, वशीकरणकर्म, मायावी प्रयोग व ज्यांतील पाणी कमी अधिक होत नाही असे जलप्रवाह दूषित करण्याचा प्रकार, हीही त्यांत वर्णिलीं असून, हे नृपश्रेष्ठा, ज्या ज्या उपायांची योजना केली असतां लोक श्रेष्ठ असा धर्ममार्गापासून भ्रष्ट होणार नाहीत ते सर्व उपाय ह्या नीतिशास्त्रामध्यें सांगितले आहेत. हें उत्कृष्ट प्रकारचे शास्त्र निर्माण केल्यानंतर आनंदित होऊन भगवान् प्रभु ब्रह्मदेव इंद्र प्रभृति सर्व देवतांना म्हणाला कीं, ''लोकांना उपयोग व्हावा व धर्मादि त्रिवर्गाची स्थापना व्हावी यासाठीं मी आपल्या बुद्धीनें सरस्वतीचें केवळ नवनीतच असें हें नीतिशास्त्ररूपी ज्ञान निर्माण केलें आहे. हें शास्त्र दंडाच्या साहाय्यानें सर्व लोकांचें संरक्षण करील; व निग्रह आणि अनुग्रह करीत राहून लोकांमध्यें प्रचारांत येईल. ह्या शास्त्रांत सांगितलेल्या दंडाच्या योगानें लोकांना पुरुषार्थरूपी फलाची प्राप्ति होते, किंवा या शास्त्रावरून दंड केला जातो, म्हणून हे दंडनीति या नावाने प्रसिद्ध होऊन त्रैलोक्यामध्यें वास्तव्य करील. संधि, यान, परिगृह्यासन, द्वैधीभाव, अन्यनृपाश्रय व विगृह्यासन ह्या सहा गुणांचें विवरण हेंच जीमध्यें सारभूत आहे, अशी ही राजनीति, पुढे महात्म्या पुरुषांमध्यें राहील. हिजमध्यें धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे सर्व सांगितलेले आहेत. असें ब्रह्मदेवानें भाषण केल्यानंतर, प्रजेच्या आयुष्याचा ऱ्हास होत आहे असें जाणून, अनेक मूर्तिसंपन्न, विशालनयन, कल्याणकारक व नित्य अशा पार्वतीपति भगवान् श्रीशंकरांनीं त्या नीतीचा प्रथम अंगीकार केला व त्यांनीं ब्रह्मदेवानें केलेल्या मोठमोठ्या अस्त्रांचें वर्णन असलेल्या त्या शास्त्राला संक्षिप्त स्वरूप दिलें. या संक्षिप्त नीतिशास्त्राला वैक्षालाक्ष असें म्हणतात. त्याचें अध्ययन करून महातपस्वी व द्विजहितकारक इंद्रानें त्या दहा हजार अध्याय असलेल्या श्रीशंकरोक्त शास्त्राचाही संक्षेप केला. बा युधिष्ठरा, त्याचे पांच हजार अध्याय असून त्याला बाहुदंतक अशी संज्ञा आहे. सामर्थ्यसंपन्न अशा बृहस्पतीनें आपल्या बुद्धीनें त्याही शास्त्राला संक्षेप देऊन त्याचे तीन हजार अध्याय केले. त्याला बार्हस्पत्य शास्त्र असें म्हणतात. अत्यंत ज्ञानसंपन्न योगाचार्य व महाकीर्तिसंपन्न शुक्र यानें तेंही शास्त्र एक हजार अध्याय करून संक्षेपांत आणिलें. याप्रमाणें मनुष्यांचें आयुष्य स्वल्प आहे व त्यांचा ऱ्हास होत आहे असें जाणून महर्षीनीं लोकांच्या अनुरोधानें त्या शास्त्राला संक्षिप्त स्वरूप दिलें.''

राजनीतिशास्त्राची व्यापकता, त्यांत अंतर्भूत होणारे निरनिराळे विषय, ह्या संबंधाची व्यापक व यथायोग्य कल्पना देणारा इतका उत्तम उतारा महाभारताशिवाय दुसऱ्या ग्रंथांत क्वचित्च आढळेल. राजनीतिपर ज्या ग्रंथांचा उल्लेख मागें केलेला आहे, त्यांत या उताऱ्यांतील सर्व विषयांचें विवेचन केलेलें आढळत नाहीं. कांही कांही विषयांचें विवेचन केलेलें आढळतें. मात्र शुक्रनीति हा ग्रंथ अपवादात्मक समजावा लागेल.

महाभारतांतील वरील उताऱ्यांत राजनीतींत अंतर्भूत होणाऱ्या ज्या कित्येक बाबींचें दिग्दर्शन केलें आहे, त्यांपैकी बऱ्याच बाबींचें पद्धतशीर विवेचन शुक्रनीतिग्रंथांत केलेलें

आढळतें. राज्याचीं सूत्रें हालविणाऱ्या राजकारणी पुरुषास मार्गदर्शक व उपयुक्त असा शुक्रनीतीशिवाय दुसरा ग्रंथ क्वचित्‌च आढळेल. शुक्रप्रणीत नीतिग्रंथाविषयीं प्रशंसा व महती या ग्रंथाच्या पुढील वचनांत गायिली असून ती या ग्रंथांचें सर्वसाधारण स्वरूप लक्षांत घेतां यथार्थ आहे असे कोणासही कबूल करावें लागेल.

*मन्वाद्यैराद्दतो योऽर्थस्तदर्थों भार्गवेण वै ।*
*द्वाविंशतिशतं श्लोका नीतिसारे प्रकीर्तिता: ॥ ४२६ ॥*
*शुक्रोक्तनीतिसारं यश्चिन्तयेदनिशं सदा ।*
*व्यवहारधुरं वोढुं स शक्तो नृपतिर्भवेत् ॥ ४२७ ॥*
*न कवेस्सद्दशा नीतिस्त्रिषु लोकेषु विद्यते ।*
*काव्यैव नीतिरन्या तु कुनीतिर्व्यवहारिणां ॥ ४२८ ॥*
*नाश्रयंति च ये नीर्तिं मन्दभाग्यास्तु ते नृपा: ।*
*कातर्याद्धनलोभाद्वा स्युर्वै नरकभाजना: ॥ ४२९ ॥*
*शु. नी. अ. ४ प्रकरण ७ वें*

अर्थ-मन्वादि ऋषींनीं ज्या शास्त्राची प्रशंसा केली तें शास्त्र 'शुक्रनीतिसार' या नांवाच्या ग्रंथांत बावीसशें श्लोकांत भार्गव अथवा शुक्र यानें ग्रथित केलें. जो राजा शुक्रानें त्रोटक स्वरूपांत रचलेल्या या ग्रंथाचा अभ्यास करतो तो राज्यभार वाहण्यास समर्थ होतो. या जगांत शुक्रानें केलेल्या नीतिसारा सारखा दुसरा ग्रंथ नाहीं. राजकारणी पुरुषास अभ्यासण्यास योग्य असा शुक्रनीति हा एकच ग्रंथ आहे. दुसरे ग्रंथ या ग्रंथापुढें कुचकामाचे आहेत. दु:खानें अगर लोभानें या नीतीस अनुसरून जे अभागी राजे आचरण करीत नाहींत ते नरकाप्रत जातात.

आतां राजनीतिशास्त्राची राजास उपयुक्तता व आवश्यकता काय कारणास्तव आहे? या मुद्द्यासंबंधीं राजनीतीवर ग्रंथ रचणाऱ्या कांहीं ग्रंथकारांच्या अभिप्रायांचें येथें दिग्दर्शन करितों. शुक्रनीतीचे प्रारंभीं या विषयींचीं कांहीं वचनें आहेत. त्यांचा थोडक्यांत सारांश प्रस्तुत स्थळीं देतों. लोककल्याणार्थ ब्रह्मदेवानें नीतिशास्त्राची रचना केली, असें मत शुक्राचार्यांनीं प्रदर्शित केलें आहे. पृथ्वीवरील राजांच्या व इतरांच्या भरभराटीस्तव राजनीतिशास्त्र रचण्यांत आलें, असं वशिष्ठ व शुक्राचार्य यांचें मत असल्याचें शुक्रनीतींत सांगितले आहे. एकाद्या विशिष्ट विषयावरील ग्रंथांत त्या शास्त्राचाच मात्र विचार केलेला असतो; परंतु नीतिशास्त्रांत मानवी समाजाचें समष्टिदृष्ट्या जें हित असतें ते साधण्यास्तव व मानवी समाज कायम टिकण्यास्तव हें शास्त्र अवश्य आहे असें शुक्रनीतींत सांगितलें आहे. सद्‌गुण, संपत्ति, भोग व मुक्ति यांचा उगम राजनीतिशास्त्रापासून होत असल्यामुळें राजांनी व इतर लोकांनीं या शास्त्राचा काळजीपूर्वक अभ्यास करावा. परशत्रूवर विजय संपादन करण्याचें सामर्थ्य याच शास्त्राच्या अभ्यासाच्या योगानें प्राप्त होत असल्यामुळें, तसेंच आपल्या प्रजेशीं प्रेमानें व गुण्या-गोविंदानें कसें वागावें, राजकारणाचे डावांत प्रावीण्य कसें संपादन करावें, इत्यादि विषयांचें ज्ञान राजनीतिशास्त्राचा अभ्यास केल्यानें


२६/५/०८
१प्रु.

राजास प्राप्त होत असल्यामुळें राजानें या शास्त्राचा अभ्यास करणें अवश्य आहे. व्याकरण, न्याय, तर्क, मीमांसा, इत्यादि शास्त्रांच्या अभ्यासानें त्या त्या शास्त्रांत अंतर्भूत होणाऱ्या विषयाचें ज्ञान होतें, व या शास्त्रांची ज्यांना जरूरी भासते, ते या विषयांचा अभ्यासही करितात. परंतु नित्य व्यवहार करण्यास ज्या प्रकारचें कौशल्य व बुद्धिमत्ता, मानवी प्राण्याचे आंगी यावी लागते,ती या इतर शास्त्रांचे अभ्यासानें येऊं शकत नाही, नीतिशास्त्राच्या अभ्यासाची गोष्ट मात्र अगदी निराळी आहे. ज्याप्रमाणे अन्नपाण्यावांचून मनुष्यप्राणी जगणें शक्य नाही; त्याचप्रमाणे राजनीति शास्त्राच्या ज्ञानावांचून मानवी प्राण्याचा व्यवहार सुरळीत चालणें शक्य नाहीं. एकाद्या तारवास भोंक पडलें म्हणजे जसें तें तारूं समुद्राचे तळाशीं जातें, त्या प्रमाणें नीतिशास्त्राच्या ज्ञानाचा अभाव राज्याच्या नाशास कारणीभूत होतो. स्वत:च्या स्वार्थासाठीही राजानें नीतीचें रक्षण करणें अवश्य आहे. राजाचीं दोन प्रमुख कर्तव्यें आहेत. ती (१) प्रजेचें संरक्षण करणे व (२) अपराध्यांस शासन करणें हीं होत. नीतिशास्त्राच्या ज्ञानावांचून हीं दोन्हीं कर्तव्यें राजास योग्य प्रकारें बजावतां येणार नाहींत. यास्तव राजानें नीतिशास्त्राचा अभ्यास अवश्य करावा, असें मत शुक्राचार्यांनीं प्रदर्शित केलें आहे. आतां दर्शविलेल्या स्वरूपाचें राजनीतिविषयक वाङ्मय व त्याचा अभ्यास करणारे विद्वान लोक ज्या आपल्या या भरतखंडांत होते, त्यांत शिवाजीचा जन्म व त्याच्या चारित्र्याचा विकास झाला असल्याकारणानें स्वराज्य स्थापनेचें कार्य हातीं घेण्यापूर्वी व तें हातीं घेतल्यानंतर शिवाजीनें तें यशस्वी रीतीनें पार पाडतांना कोणत्या राजनीतीचा अवलंब केला असला पाहिजे, याचें प्रस्तुत स्थळीं दिग्दर्शन करितों. शिवाजीचा उदय व त्याचें स्वराज्यस्थापनेचें कार्य मोंगलांची व विजापूरच्या आदिलशाहीची सत्ता भरतखंडांत नांदत असतां त्यानें सिद्ध केल्यामुळें स्वराज्याची घटना त्यानें मोंगली किंवा आदिलशाही राजनीतीचें अनुकरण करून केली असें मत कित्येकां कडून प्रदर्शित करण्यांत येतें हे मागें आम्हीं दिलेंच आहे. या मतांत कितपत तथ्य आहे, या प्रश्नाची चर्चा उपलब्ध झालेल्या साधनांचे आधारें करणें अवश्य आहे.

ही चर्चा करतांना शिवाजीच्या बालवयांत त्याला शिक्षण कोणत्या प्रकारचें मिळालें होतें व त्याला आदिलशाही व मोंगली दरबारी वातावरणाचा संपर्क कितपत घडला होता, या महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करावा लागेल. शिवकालीन बखरीशिवाय अलीकडे उपलब्ध झालेल्या शिवभारत ग्रंथांतील या प्रश्नांविषयी उपलब्ध झालेला पुरावा पहिल्या भागांत उदधृत करण्यांत आला असल्यामुळें त्याची येथे पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाही. या पुराव्यावरून शिवाजीच्या बालवयांत त्याला आपल्या प्राचीन संस्कृतीस पोषक अशाच प्रकारचें शिक्षण देण्यांत आले होतें, असें दिसून येतें. याशिवाय अलीकडे प्रसिद्ध झालेला, ''राधामाधवविलासचंपू'' या ग्रंथात वरील प्रश्नांसंबंधी महत्त्वाचा पुरावा मिळाला आहे. ''राधामाधवविलासचंपू'' वरून शिवाजीचा बाप शहाजी हा बहुश्रुत, विद्यासंपन्न व विद्येचा भोक्ता होता आणि त्याचे पदरीं अनेक विद्वान पंडित व राजकारणपटु मुत्सद्दी होते, ही गोष्ट सिद्ध झाली आहे. शिवाजीस त्याच्या उच्च दर्जास शोभेलसें शिक्षण शहाजीनें दिलें असलें पाहिजे, असेंच अनुमान काढणें युक्त आहे. शिवाजीस

मिळालेल्या शिक्षणासंबंधींचा हा पुरावा लक्षांत घेतला असतां, त्याच्या बालवयांत मुसलमानी संस्कृतीचें वळण त्यास लागलें नव्हतें, हें उघड आहे. आदिलशाही अगर मोगली दरबारच्या वातावरणाचा संपर्क शिवाजीस यत्किंचित्‌ही घडला नव्हता. आदिलशाही घराण्याची राजधानी जें विजापूर शहर त्या शहरीं शिवाजीचा संताप करणाऱ्या व त्याच्या मनास उद्वेग देणाऱ्या गोष्टी घडत व त्या गोष्टींचा प्रतिकार शिवाजी तत्काळ करण्यास कचरत नसे. या त्याच्या वर्तनामुळे त्याला आदिलशाही दरबारांत फार दिवस ठेवणें युक्त नाहीं, असें वाटून शहाजीनें त्याची रवानगी त्याच्या वयाच्या बाराव्या वर्षीं पुण्याच्या जहागिरीचे प्रांताकडे केली. शिवाजीची रवानगी पुण्याच्या जहागिरीकडे करण्यापूर्वी त्याचें त्या शहरांत वास्तव्य असतां त्याच्या मन:स्थितीचें हुबेहूब वर्णन त्याच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांत पुढें दिल्याप्रमाणें केलेलें आढळतें.

"आपण हिंदू व हे यवन, परम नीच, यां परते नीच दुसरे कोण आहे? अत्यंजादिकांचा संपर्क करितात, त्यांची सेवा करणें, त्यांचें अन्न भक्षणें, आर्जव करणें, त्यांस नमस्कार करणें, (यांनी) माझे प्रकृतीस फार त्रास उत्पन्न होतो. (यवन) गोवधादि करितात. ब्राह्मण-वध व धर्मांची निंदा हें पाहाणें परम अनुचित दिसतें! आपण रस्त्यांनी जातां गोवध होतो; तें पाहातांच त्याचा शिरच्छेद करावा ऐसें वाटतें व श्रम वाटतात, गाईस पीडा पाहावी, त्याहून आपलें जीवित्व व्यर्थ. वडील काय म्हणतील हें च (संकट) येऊन पडतें; नाहीं तरि पाहातांच समयीं गाईस पीडा करणाऱ्याचा वध करवावा हें मनांत येतें. मुसलमानांचा संसर्ग करणें चांगलें नाहीं. तसेंच पादशाही दरबारास जाणें अथवा हरयेक अमीर याचे घरी जाणें ठीक नाहीं." (परत) येतांच (शिवाजी राजे यांनी) स्नान करावें, दुसरीं वस्त्रें घ्यावीं, ऐसें करूं लागले. आणि या अन्वयें सांगून पाठविले." (प्र. २ परि. ४०)

या उताऱ्यावरून, शिवाजीचे स्वभावास यवनी अथवा म्लेच्छ-संस्कृतीचा लहानपणापासून तिटकारा वाटत असे ही गोष्ट सिद्ध होते. याशिवाय प्रस्तुत स्थळीं या विषयींचा एक महत्त्वाचा मुद्दा नमूद करणें जरूर आहे. शिवाजीच्या काळीं अस्तित्वांत असलेल्या ज्या दोन प्रबल मुसलमानी राजसत्ता मोंगल व आदिलशाही, यांचे राजनीतिपर वाङ्मय अत्यंत क्षुद्र स्वरूपाचें असून त्याचा परिचय भारतीय राजनीतिपर ग्रंथांप्रमाणे महाराष्ट्रांतील थोड्या लोकांस होता. प्रसिद्ध झालेल्या इतिहाससाधनांची तपासणी करितां, यावनी राजनीतीच्या तत्त्वांचें ज्यांत विवेचन केलें आहे असे त्या काळचे दोन लेख उपलब्ध झाले आहेत. एक लेख म्हटला म्हणजे विजापूरचा बादशहा सुलतान महमद आदिलशाह यानें राजव्यवस्थविषयीं केलेले नियम हे होत. हा बादशहा इ. स. १६२३ ते १६५३ पावेतों विजापूरच्या आदिलशाही घराण्याच्या तक्तावर होता. हा बादशहानें केलेले हे नियम एकंदर ब्यांयशीं आहेत. सामान्य राज्यकारभार चालविण्यविषयींची माहिती या नियमांत आहे. राजनीतिशास्त्रपर ग्रंथ हे नांव या लेखास देणें वाजवी होणार नाही. राष्ट्र (राज्य), त्याचीं निरनिराळीं अंगें, तसंबंधींची तत्त्वें इत्यादि विषयांचें विवेचन यांत नाही (ऐतिहासिक स्फुट लेख पान २५ पारसनीसकृत). या लेखाशिवाय अकबरी दस्तरुल अलम (अकबर बादशहाची राजनीति) हा फारशी ग्रंथ त्या काळी प्रसिद्ध होता. या ग्रंथाचें

मराठी भाषांतर सातारच्या पारसनीस घराण्यांतील नरसिंह विठ्ठल उर्फ बाबा पारसनीस कृत यांनी केलेलें उपलब्ध झालें आहे (ऐतिहासिक स्फुट लेख पारसनीस पान ४१). या ग्रंथातही, शुक्रादि-राजनीतिग्रंथांत राजनीतिशास्त्रांतर्गत (शि. रा. ६) तत्त्वांचे जशा प्रकारचें विवेचन केलेलें आहे तशा प्रकारचें विवेचन केलेलें आढळत नाहीं. शिवाजीच्या सन्निध असणाऱ्या राजकारणी पुरुषांचा अकबराच्या राजनीतिग्रंथांशीं परिचय असण्याचा क्वचित् संभव आहे. आतां सांगितलेल्या या गोष्टी विचारांत घेतां, शिवाजीनें भारतीय राजनीतीवांचून अन्य कोणत्याही राजनीतीचा अंगीकार केला होता, असें विधान करणें सपशेल चुकीचें ठरेल. पुण्याच्या जहागिरीकडे शिवाजीची रवानगी शहाजीनें केल्यावर शिवाजीनें स्वराज्य-स्थापनेच्या कार्यास लागलीच प्रारंभ केला. त्या वेळीं त्याच्या निकट सहवासांत कोण लोक होते? या गोष्टींचा विचार, शिवाजीची राजनीति कोणत्या स्वरूपाची होती हें निश्चित करण्याकरितां करणें जरूर आहे. तो केल्यास पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहणारा शहाजीचा विश्वासू कारभारी दादोजी कोंडदेव हा होता, व त्याच्या देखरेखीखालीं व त्याच्या सल्ल्यानें शिवाजीनें जहागिरीचा कारभार पहावा, असें ठरल्याचें दिसतें. दादोजी कोंडदेवाशिवाय, शामराज नीळकंठ, बाळकृष्णपंत मुजूमदार, सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ कोरडे हे शहाजीच्या पदरचे मुत्सद्दी शिवाजीची रवानगी पुण्याकडे करतांना शहाजीनें त्याच्या बरोबर दिले होते. हे सर्व लोक राजनीति-पारंगत व राजकारणपटु होते. दादोजी कोंडदेवाचे निवाडे उपलब्ध झाले आहेत; त्यावरून त्याचा स्मृति-ग्रंथांशी पूर्ण परिचय असल्याचें दिसून येतें. अशा प्रकारच्या कारभाऱ्यानें शिवाजीच्या बालवयांत त्यास भारतीय राजनीतींचें शिक्षण दिलें असलें पाहिजे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाही. या लोकांच्या तालमींत शिवाजी वाढला असल्याकारणानें स्वराज्याची स्थापना व विस्तार करण्याचे कामीं शिवाजीनें भारतीय राजनीति-शास्त्राचीं तत्त्वें आपल्या दृष्टीपुढें ठेवून तदनुसार तो वागत असला पाहिजे हें उघड आहे. शिवाजीचे गुरु व त्याचे समकालीन रामदास स्वामी यांचे या मुद्द्यावर प्रकाश पाडणारे खालील उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

*''उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।।*
*धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ।।''*

या समर्थांच्या उद्गगारांवरून शिवाजी महाराजांच्या अवतीभोवती कोणत्या संस्कृतीची अभिमानी मंडळी होतीं हें दिसून येतें.

येथपावेतों केलेल्या विवेचनावरून शिवाजीनें स्वराज्य-स्थापना व विस्तार करण्याचे कामीं भारतीय राजनीति शास्त्रांतर्गत तत्त्वांचा मुख्यत्वेंकरून अंगीकार केला होता व शास्त्रानुसारच त्यानें आपली राजनीति बनविली होती हें सिद्ध होतें. तथापि भारतीय राजनीतिशास्त्रांतील यच्चयावत् तत्त्वें, त्यानें जशींच्या तशींच अंगीकारिलीं होतीं असें विधान करणें बरोबर होणार नाही. राजनीति ही अचल नसून काळ, देश, परिस्थिति इत्यादि उपाधीचे योगानें बदलणारी असल्यामुळें, शिवाजी ज्या काळीं उदयास आला

त्या काळच्या विशिष्ट परिस्थित्यनुरूप स्वराज्य-स्थापनेचें कठीण कार्य सिद्ध करतांना त्याला कांही नूतन राजनीतीच्या नियमांचा अंगीकार करावा लागला. अशा कांही नूतन नियमांची भारतीय राजनीतीच्या तत्त्वांस जोड देऊन जिला शिवाजीची राजनीति म्हणतां येईल अशी राजनीति त्याने बनविल्याचें दिसून येतें. या त्याच्या राजनीतीविषयीं विपरीत ग्रह न होतां तिचें वास्तविक स्वरूप लक्षांत येण्यास्तव आम्हीं कांही महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत, ते लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

(१) शिवाजीनें स्वराज्याची स्थापना करण्याचा प्रारंभ ज्या वेळीं केला, त्या वेळच्या त्याच्या योग्यतेनुसार त्याच्या राजनीतीचें विशिष्ट रूप बनलें गेलें. स्वराज्य-स्थापनेस त्याने प्रारंभ केला त्या वेळीं तो एकाद्या लहानशा स्वतंत्र राज्याचा मालक नव्हता ही गोष्ट जरी खरी असली तरी तो क्षुद्र असा जमीनदारही नव्हता हें लक्षांत ठेविलें पाहिजे. विजापूरच्या दरबारांतील एका प्रबळ व संपन्न सरदाराचा तो मुलगा असून त्याच्या पुण्याच्या जहागिरीच्या प्रदेशावर तो एकाद्या मांडलिक राजाप्रमाणें आपली सत्ता चालवीत असे. अशी त्याची योग्यता असूनही तो एका गरीब, शेती करणाऱ्या पाटलाचा मुलगा होता असा विपर्यास त्याच्या इतिहासकारांनी करून ठेविला व त्यामुळेंच स्वराज्य-स्थापनेच्या प्रारंभींचे काळांत त्यानें केलेलीं कृत्यें राजनीतिदृष्ट्या योग्य असूनही तीं विपरीत स्वरूपाची भासतात.

(२) शिवाजीच्या उदय काळची परिस्थिती व त्याचें वैयक्तिक सामर्थ्य या गोष्टी लक्षांत न घेतां, त्याच्या कृत्याचें परीक्षण करण्यांत त्याच्या इतिहासकारांनी व चरित्रकारांनी चूक केली आहे. स्वराज्य-स्थापनेस शिवाजीनें प्रारंभ केला त्या काळीं उत्तर व दक्षिण भारतांत दोन प्रबल मुसलमानी राजकीय सत्ता नांदत होत्या. याशिवाय इंग्रजादि पाश्चात्त्य राष्ट्रांचा भरतखंडांत शिरकाव होऊन, हिंदुस्थानांतील मुलूख काबीज करून आपली राजकीय सत्ता प्रस्थापित करावी, अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्या ठिकाणींही उदित झाली होती. अशा परिस्थितींत शिवाजीच्या हालचालींमुळे सर्व देश हादरून जाऊन देशभर खळबळ उडून जात असे व पाश्चात्यांचा व्यापार सुरळीतपणें चालण्याचें बंद पडून त्यांच्या द्रव्यशोषणाचे कार्यास अडथळा होत असे त्यामुळें सर्व लोकांना त्या काळीं शिवाजी शत्रूसारखा भासत होता. शिवाय शिवाजीसारख्या अल्प बळाच्या व्यक्तीस प्रबळ शत्रूंशी झगडून त्यांचेवर आपला दरारा बसविण्याकरितां व द्रव्य-संपादनाकरितां पूर्वी कोणास न सुचलेल्या व कोणीं अमलांत न आणलेल्या साधनांचा आश्रय करावा लागला. परंतु त्यानें उपयोगांत आणलेल्या या साधनांचें परीक्षण राजनीतिदृष्ट्या कोणीं न केल्यामुळें त्यानें कोशसंचयार्थ केलेल्या कृत्यांविषयीं विपरीत ग्रह उत्पन्न केले गेले आहेत.

(३) शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेच्या ध्येयाच्या स्वरूपाविषयींची यथातथ्य कल्पना फार थोड्या लोकांना आहे. अपार द्रव्य अगर मुलूख संपादन करण्यापलीकडे स्वराज्याची स्थापना करण्याचें त्याचें ध्येय नव्हतें असें कित्येकांचें मत आहे. हें मत आतां ऐतिहासिक भरपूर पुराव्यानें चुकीचें ठरून शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेचें ध्येयच महाराष्ट्रधर्माची

स्थापना करणें हें होतें हा सिद्धांत सर्वसंमत झाला आहे. शिवाजीच्या राजनीतीचें स्वरूप ठरवितांना, त्याच्या या ध्येयाकडे दुर्लक्ष केल्यास त्याच्या राजनीतिविषयीं काढण्यांत आलेले सिद्धांत चुकीचे ठरल्याखेरीज राहणार नाहींत.

(४) शिवाजीस ज्या प्रबळ मुसलमान राज्यसत्ताधाऱ्यांशी झगडा करून, स्वराज्याची स्थापना करावयाची होती; त्यांच्या मनांत त्याच्या स्वत:विषयीं असलेल्या द्वेषाची तीव्रता होऊं नये, व सर्वसामान्य मुसलमान धर्मानुयायी लोकांचीं मनें दुखविलीं जाऊं नयेत व स्वतांविषयी त्यांची सहानुभूति मिळावी या हेतूनें मुसलमानधर्मीयांस पूज्य अशा कुराण व मशिदी यांचे बाबतींत त्यानें विशिष्ट धोरण स्वीकारलें होतें.

(५) शिवाजीनें स्वराज्याची स्थापना केल्यावर पूर्वकालीं अस्तित्वांत असलेल्या राज्यपद्धतींत जे दोष त्याला आढळून आले, व ज्या दोषांमुळें स्वराज्य-स्थापनेचें कार्य सिद्ध करणें त्याला सुलभ गेलें, त्या दोषांची त्याच्या राज्यास भविष्य काळीं बाधा होऊं नये, म्हणून सकृत्‌दर्शनीं विपरीत भासणारीं अशीं वतनें व वेदपठण करणाऱ्या ब्राह्मणांस पूर्वकालीन राजांनी दान दिलेल्या जमिनी या बाबतींत त्यानें कांही नूतन नियम ठरवून ते अमलांत आणल्याचें दिसून येतें.

(६) महाराष्ट्र देशाचें एक प्रकारचें भौगोलिक वैशिष्ट्य आहे. या देशांत दक्षिणोत्तर सह्याद्रीची रांग असून तींत अनेक उंच शिखरें आहेत. त्याचप्रमाणें मोठमोठीं खोरींही या प्रदेशांत आहेत. या देशाच्या पश्चिम बाजूस अरबी समुद्र असून दक्षिणोत्तर बराच लांब असा समुद्र किनारा आहे. या किनाऱ्यावर अनेक बंदरे व खाड्या आहेत. या देशाच्या या भौगोलिक वैशिष्ट्यामुळे शिवाजीच्या राजनीतींत कांही नूतन राजनीतीचे नियम त्यानें समाविष्ट केले आहेत.

शिवाजीच्या राजनीतींचें सामान्य स्वरूप व तिला ज्या बाबींमुळें वैशिष्ट्य प्राप्त झालें त्या बाबी यांचें दिग्‌दर्शन केल्यावर तिचें यथातथ्य वर्णन करण्यास उपयुक्त अशा साधन-सामुग्रीचें आम्ही आतां दिग्‌दर्शन करितों. ही सामुग्री दोन प्रकारची उपलब्ध झाली आहे. शिवाजीच्या हयातीच्या काळांतील व त्याच्या पश्चात् मराठी साम्राज्य लयास जाईतोपर्यंतच्या काळांतील. दुसऱ्या प्रकारच्या साधनसामग्रीचें महत्त्व जरी कमी प्रकारचें असलें तथापि तीवरून निघणारीं अनुमानें नि:संशय कमी किंमतीचीं नाहींत.

शिवाजीच्या उदयापासून त्याच्या निधनापावेतोंच्या काळांतील त्यानें स्वत: दुसऱ्यांस लिहिलेंली अगर इतरांनी त्यास लिहिलेलीं अशीं पत्रें, त्याचप्रमाणें या पत्रांशिवाय अन्य जातीचे त्या काळांतील लेख (ज्यांत त्याच्या हालचालींचे उल्लेख आहेत) अशा प्रकारची सामुग्री फार महत्त्वाची आहे. मराठी भाषेंतील शिवकालीन पत्रांची व इतर लेखांची संख्या फार थोडी आहे. परंतु त्या काळांतील इंग्रजी भाषेंतील पत्रांची संख्या फार मोठी असून तीं सर्व ''इंग्लिश रेकॉर्डस् ऑन् शिवाजी'' या ग्रंथांत अलीकडे छापून प्रसिद्ध झालीं आहेत. शिवाजीच्या राजनीतिवषयी या पत्रांत बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. या स्वरूपाच्या शिवकालीन लेखांच्या खालोखाल महत्त्वाचें व उपयुक्त असें वाङ्‌मय म्हटले म्हणजे ''जयराम पिंडे-कृत राधामाधव विलास चंपू, परमानंद कवीचें

शिवभारत, प्रणालपर्वताख्यान, कृष्णाजी अनंत सभासदकृत शिवचरित्र'' इ. होय. शिवाजीच्या समकालीन पुरुषांनी लिहिलेले हे ग्रंथ त्याच्या चरित्रपर आहेत. याशिवाय पाश्चात्त्य लोकांनी लिहिलेली त्याचीं चरित्रें उपलब्ध झालीं आहेत. शिवाजीच्या पश्चात् मराठी राज्य लयास जाण्याचे सुमारास रचण्यांत आलेल्या शिवचरित्राविषयीं माहिती देणाऱ्या बखरी हें दुय्यम दर्जाचें वाङ्मय उपलब्ध झाले आहे. शिवाय शिवाजीच्या समकालीन इतिहासकारांनी लिहिलेले इतिहास, काफीखान, ९६ कलमी बखर हें वाङ्मयही महत्त्वाचे आहे. एकाद्या मोठ्या भुशाच्या ढिगांतून गव्हाचे दाणे जसे निवडून काढून त्यांची विशिष्ट तऱ्हेनें मांडणी करावयाची त्या सारखेंच, या साधन-सामुग्रींतून शिवाजीच्या राजनीतीचे नियम हुडकून काढून त्यांचें दिग्दर्शन करणें, हें कृत्य आहे.

आतां दर्शविलेल्या साधन-सामुग्रीशिवाय शिवकालीन राजनीतिविषयक उपलब्ध झालेला त्रुटित ग्रंथ म्हणजे रामचंद्र नीलकंठ अमात्य यांचें आज्ञापत्र हा होय. हा ग्रंथ फार लहान असला, तथापि शिवाजीची राजनीति सूत्ररूपानें व मोठ्या मार्मिक रीतीनें यांत वर्णन केली असल्यामुळें तो अपूर्व आहे. हा ग्रंथ साग्र उपलब्ध झाला नाही; ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे! शिवाजीचे पश्चात् संभाजीनें रचलेला ''बुधभूषण'' हा राजनीतीपर ग्रंथ, त्याचप्रमाणें मराठेशाहीच्या समाप्तीचें समयीं रचण्यांत आलेली मल्हार रामराव चिटणीस कृत ''राजनीती'' हेही उपयुक्त ग्रंथ आहेत. बुधभूषण या ग्रंथांत राजनीतीविषयक संस्कृत ग्रंथांतील वचनें एकत्रित करण्यांत आलीं आहेत. मल्हार रामराव चिटणीसकृत राजनीतींत, महाभारतांतर्गत शांतिपर्वांत भीष्मांनी धर्मराजास सांगितलेल्या राजधर्मांतील कित्येक तत्त्वें, आणि शुक्रनीतींत दिलेलीं तत्त्वें मराठी भाषेंत ग्रथित केलीं आहेत.

शिवाजीच्या राजनीतीविषयीं यथातथ्य अनुमान करण्यास उपयुक्त असें तत्कालीन दुसरें एक महत्त्वाचें उपलब्ध झालेलें साधन छत्रपति शिवाजी महाराजांचे गुरु श्रीसमर्थ रामदास स्वामी यांचें, राजधर्म, क्षात्रधर्म, सेवकधर्म, उत्तम पुरुष, कारखानेप्रकरण इत्यादि विषयींचें वाङ्मय होय. त्यावरून शिवाजीच्या राजनीतीविषयीं कांही अनुमानें काढतां येतात. परमानंदकविकृत संस्कृत शिवभारत ग्रंथांत शिवाजीस देण्यांत आलेलें शिक्षण, त्याचप्रमाणें त्यानें अवलंबिलेली राजनीति या विषयीं पुष्कळ माहिती नमूद केलेली आहे.

शिवाजीच्या राजनीतीचें स्वरूप दर्शविण्याकरितां उपयुक्त अशा सामुग्रीचें विवेचन केल्यावर छत्रपति शिवाजी महाराज हे कोणत्या राजनीतीस प्रमाण मानून तिचें अवलंबन करीत असत हा प्रश्न स्वाभाविकपणें उपस्थित होतो. उपलब्ध झालेल्या सामुग्रीच्या आधारें असें निश्चित विधान करण्यास प्रत्यवाय दिसत नाही कीं, शिवाजी व त्याच्या सहवासांत असणारे त्याचे समकालीन राजकारणी पुरुष हे शुक्रनीतीचे अनुयायी असून ते आपलीं राजकारणें या ग्रंथांतील तत्त्वांस अनुसरून करीत असत. या विधानाची सत्यता या ग्रंथाच्या पुढील भागांत आम्हीं केलेल्या विवेचनावरून पटल्याखेरीज राहणार नाही, असा आम्हांस भरंवसा वाटतो.

अ इ